## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४८/२०२०** | **दिनांक १६/०६/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १०/०६/२०२० ते १६/०६/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १७/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून २१/०६/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१०/०६** | **११/०६** | **१२/०६** | **१३/०६** | **१४/०६** | **१५/०६** | **१६/०६** | | **१७/०६** | **१८/०६** | **१९/०६** | **२०/०६** | **२१/०६** |
| ८.० | १८.२ | १३.० | ४५.८ | १५.२ | २०.० | १८.८ | **पाऊस (मिमी)** | १३० | ९० | ७३ | ७६ | ७८ |
| ३१.४ | ३२.२ | ३१.२ | ३०.० | ३१.० | ३१.२ | २९.५ | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३३ | ३३ | ३३ | ३३ |
| २३.० | २२.५ | २४.० | २२.४ | २३.८ | २४.५ | २४.७ | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २५ | २४ | २४ |
| ४ | ४ | ६ | ८ | ६ | ८ | ६ | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ८ | ८ | ८ | ७ |
| ९२ | ९६ | ९६ | १०० | ९५ | ९८ | ९८ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९६ | ९६ | ९६ | ९६ | ९५ |
| ७५ | ७६ | ८५ | ७६ | ८६ | ८८ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ९२ | ९३ | ९२ | ९१ | ९१ |
| ५.२ | ४.२ | ६.२ | ६.० | ५.५ | .५ | ४.७ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १४ | ११ | १० | ७ | १० |
| नै. | नै. | ऊ. | शांत | शांत | शांत | शांत | **वाऱ्याची दिशा** | नै. | नै.द. | नै.द. | द. | द. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **१३९.०** | **४५८.६** | **५१३०.९** |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १७ ते २१ जून, २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता असून दिनांक १७ जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **रोप अवस्था** | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भात रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• भात क्षेत्रातील बांधांची बांधबंधीस्ती करावी तसेच बांध तणमुक्त ठेवावेत.<br>• पाऊसाची तीव्रता कमी असताना भात रोपवाटिकेला युरिया खताची दुसरी मात्रा १ किलो युरिया प्रति गुंठा क्षेत्राला पेरणीनंतर १५ दिवसांनी देण्यात यावी.<br>• बांधावरील खेकड्यांच्या नियंत्रणासाठी पावसाळ्याच्या सुरुवातीला सलग २ ते ३ रात्री बांधावरील खेकडे बत्तीच्या उजेडात पकडून त्यांची संख्या कमी करावी आणि नंतर विषारी आमिषाचा वापर करून खेकड्यांचे नियंत्रण करावे. १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत आमिष वापरावे. विषारी आमिषाचा वापर सांघिकरीत्या व एकाच वेळी केल्यास खेकड्यांचे नियंत्रण करण्यास मदत होईल. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही.) |
| **नागली** | **रोपवाटिका** | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता पेरणी केलेल्या नागली पिकाच्या रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• नागली पिकाच्या रोपवाटिकेची पेरणी करावयाची राहिली असल्यास पेरणीची कामे पूर्ण करून घ्यावीत. |
| **आंबा** | **-** | • पाऊसाची तीव्रता कमी असताना आंब्याच्या झाडांना खते द्यावीत. दहा वर्षावरील आंबा कलमास ५० ते १०० कि.ग्रॅ. चांगले कुजलेले शेणखत, ३ किलो २५० ग्रॅम युरिया, ३ किलो १२५ ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट व २ किलो सल्फेट ऑफ पोटॅश खते प्रती कलमास देण्यात यावी. खते कलमाच्या विस्ताराच्या आत सुमारे ४५ ते ६० सें.मी. रुंद आणि १५ सें.मी. खोल वर्तुळाकार चर खणून द्यावीत. चरामध्ये प्रथम पालापाचोळा, शेणखत टाकून त्यावर रासायनिक खते टाकून मातीने चर बुजवून घ्यावेत. |
| **नारळ** | **-** | • पाऊसाची तीव्रता कमी असताना नारळाला खते द्यावीत. नारळाच्या पाच वर्षावरील प्रती माडास ३० कि.ग्रॅ. शेणखत, ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट, ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश खताची मात्रा बांगडी पध्दतीने देण्यात यावी. वर दिलेली खताची मात्रा पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/५ पट, दुसऱ्या वर्षी २/५ पट, तिसऱ्या वर्षी ३/५ पट आणि चौथ्या वर्षी ४/५ पट द्यावीत.<br>• मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नारळ बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **सुपारी** | **-** | • मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता सुपारी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **नवीन फळबाग** | **लागवड** | • लागवडीसाठी पूर्वतयारी केलेल्या जागेवर आंबा, काजू, चिकू फळझाडांची नवीन रोपांची लागवड करावी. पिशवीतील कलम मातीच्या हुंडीसह माती शेणखत आणि सिंगल सुपर फोस्फेटच्या मिश्रणाने भरलेल्या खड्ड्याच्या मध्यभागी ठेवून कलम लावावे. लागवड करतेवेळी कलमाचा जोड जमिनीच्या थोडा वर राहील याची काळजी घ्यावी. वाळवी पासून त्रास होवू नये |

| | | |
|---|---|---|
| | | म्हणून लागवडीच्या वेळी खड्ड्यामध्ये १०० ग्रॅम १.५ टक्के क्लोरपायरीफॉसची पावडर टाकावी. लागवडीनंतर कलमांना काठीचा आधार द्यावा. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही.) |
| **भाजीपाला** | **रोपवाटिका** | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भाजीपाला रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **पशुधन व्यवस्थापन** | **-** | • जनावरांना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच येणाऱ्या पाऊसापासून योग्य ते संरक्षण करावे.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी पॅरा गवत, संकरीत नेपियर (जयवंत को- ३, यशवंत) या बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• जनावरांना आंत्रविषार रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना लसीकरण करून घ्यावे. |
| **टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.** | | |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |